ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.०८.०१.२०२५

प्रेस नोट

**आलोसे क्र.१)प्रशांत प्रल्हाद ढमाळे वय ४२ वर्ष, व्यवसाय नोकरी, तलाठी सजा काकोडा ता.मुक्ताईनगर,जि.जळगांव रा. चिखली रणथंब ता.मलकापुर जि.बुलढाणा ह.मु.गणपती नगर, भाग ५ मलकापुर ता.मलकापुर जि.बुलढाणा. आरोपी क्र.२) अरूण शालीग्राम भोलानकर, वय– ३२ वर्ष, व्यवसाय– खाजगी नोकरी, रा.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर जि. जळगांव आरोपी क्र.३) संतोष प्रकाश उंबरकर, वय– २४ वर्ष, धंदा–चहाचा व्यवसाय रा.कुऱ्हा ता.मुक्ताईनगर जि.जळगांव यांना ५,०००/–रूपये लाच स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने रंगेहात पकडले.**

———————————०००००००———————————

तक्रारदार हे दि.१८.१२.२०२४ रोजी कुऱ्हा गावातील तलाठी कार्यालयात गेले. तेव्हा सदर ठिकाणी असलेले आलोसे क्र.१ श्री प्रशांत ढमाळे यांची त्यांनी भेट घेतली व त्यांचे आजोबा शेख अब्दुला शेख कालु पिंजारी यांच्या नावावर असलेल्या शेत गट नं. १६७/पैकी/१८ याचे ७/१२ उताऱ्यावर फिर्यादी यांचे वडीलांचे, काकाचे, आत्याचे व मयत झालेल्या काकांच्या मुलांची नावे लावण्याच्या कामासंदर्भात त्यांची भेट घेतली. तेव्हा आलोसे क्र.१ श्री प्रशांत ढमाळे यांनी सदरचे काम करून देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांच्याकडे ५,०००/– रु लाच रक्कमेची मागणी केली त्याबाबत फिर्यादी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.०१.०१.२०२५ रोजी लाचमागणी संदर्भात झालेल्या पडताळणी कारवाई दरम्याण आलोसे क्र.१ यांनी फिर्यादी यांच्याकडे वर नमुद काम करून देण्यासाठी लाचेची मागणी करू सदर ठिकाणी असलेल्या आरोपी क्र.२ भोलानकर यांचेशी फिर्यादी यांना बोलण्यास सांगितले. तेव्हा अरूण भोलानकर यांच्याशी फिर्यादी यांची चर्चा झाली तेव्हा त्यांनी फिर्यादी यांचेकडे ५,००० रू लाच रक्कमेची मागणी केली.

त्यानंतर आज दि.०८.०१.२०२५ रोजी फिर्यादी यांनी पंचासमक्ष आरोपी क्र.२ भोलानकर यांची तलाठी कार्यालय येथे जावुन भेट घेतली असता आरोपी क्र.२ भोलानकर यांनी फिर्यादी यांच्याकडुन ५,०००/–रूपये लाच रक्कम स्वत: स्विकारून ती रक्कम चहावाला संतोष उबरकर याचेकडे दिली असता संतोष उबरकर याने सदरची लाच रक्कम स्वत:जवळ ठेवुन घेतली म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**टिप :– सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकिय नोकराने त्यांचे शासकिय काम करून देण्यासाठी शासकिय फी व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **कार्यालयाचा पत्ता** | **ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**<br>**अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगांव** |
| **दुरध्वनी क्रमांक** | **०२५७–२२३५४७७** |
| **मोबाईल क्रमांक** | **९७०२४३३१३१** |
| **टोल फ्री क्रमांक** | **१०६४** |

पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**योगेश जी. ठाकूर**
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,जळगांव